# अहवाल

( एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ – मुंबई संलग्न )

जनताशिक्षणप्रसारकमंडळसंचालित

# महिला कला महाविद्यालय , औरंगाबाद

## “ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२”

मराठी विभाग प्रमुख व मराठी भाषा अधिकारी

**सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ**

महिला कला महाविद्यालय , औरंगाबाद

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित ,महिला कला महाविद्यालय,औरंगाबाद या महाविद्यालयात मराठी विभागातर्फे “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ”उत्साहात साजरा करण्यात आला . दिनांक - १४ जानेवारी २०२२ ते २८ जानेवारी २०२२ या पंधरवडा मध्ये मराठी भाषा संवर्धनासाठी विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयात **“मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ”चे उद्घाटन**महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दहिफळे आर. एन. यांचे हस्ते झाले. प्रसंगी मराठी भाषा संवर्धन काळाची गरज असुन , फक्त पंधरवडा साजरा करूनच नव्हे तर , दररोज आपल्यासर्वांकडून मराठी भाषा संवर्धन कार्य चालू असले पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त करत . या कार्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

तर प्रास्ताविकामध्ये मराठी विभाग प्रमुख , सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ यांनी पंधरवडा साजरा करताना घेण्यात येणा-या विविध कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत , महाविद्यालयातील विधार्थिनी तसेच सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन मराठी भाषा संवर्धन कार्यात सक्रियता दर्शवावी असे अहवान केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. वनिता साबळे यांनी केले व शेवटी डॉ.परमेश्वर काकडे यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले. सर्व विधार्थिनी आणि प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांना या विषयीच्या सुचना नोटीस बोर्डवर , दूरध्वनी संदेश , विधार्थिनीच्या ग्रुप माध्यमातून कळविण्यात आल्या..





# “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ” निमित्त

## विशेष व्याख्यान

### विषय -वाचन व आपण

### व्याख्याते - डॉ. बळवंत मगदूम




विधार्थिनी व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर आणि समाजातील पालक यांना मराठी भाषा , यातील ग्रंथ संपदा कळावी वाचनाने मराठीतील साहित्याचा परिचय वाचनाचे महत्व विषद करण्यासाठी महाविद्यालयातील मराठी विभागाने दिनाक - २५/०१/२०२२ रोजी ४.०० वाजता झूमच्या माध्यमातून **“वाचन व आपण** ”या प्रमुख वक्ते - **डॉ. बळवंत मगदूम ,** ( मराठी विभाग प्रमुख ) , रयत

शिक्षण संस्थेचे , श्री. रावसाहेब राजाराम पाटील महाविद्यालय , सावळज ,ता. तासगाव जिल्हा .सांगली यांचेविशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.







व्याख्याते प्रा.डॉ.बळवंत मगदूम अध्यक्ष- प्राचार्य डॉ.दहिफळे आर.एन.


मराठी भाषा संवर्वध बाबत मार्गदर्शन करतांना वाचनाचे महत्व पूर्ण योगदान असून विध्यार्थी व प्रध्यापक यांनी वाचनाकडे विशेष लक्ष द्यावे. वाचनाने विधार्थी , शिक्षक व एकूणच वाचकास विविध ज्ञान प्रवाह , साहित्य , संस्कृती , प्रभावी व प्रेरणादायी व्यक्तिचित्र याची ओळख होऊन त्याचा स्वत: व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग होतों असे विवेचन करत .स्वत:च्या वाचन आवडीने आपणास कसे साहित्य वाचनाचे उपयोग झालेत हे विविध उदाहरणाने अधोरेखित केले.


महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दहिफळे आर. एन. यांनी डॉ. बळवंत मगदूम यांनी वाचन विषयी मांडलेल्या विचाराने सर्वाना वाचनाची गोडी लागण्यास सहाय्यभूत ठरेल असे सांगून सरांचे आभार मानले , व वाचन संस्कृती वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रयन्त करण्याचे अवहान केले . कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ . पल्लवी भावसार यांनी केले , शेवटी या दूर दृश्य प्रणाली द्वारे झालेल्या कार्यक्रमाचे आभार मराठी विभाग प्रमुख जितेंद्र शेजवळ यांनी केले व या कार्यक्रमाची सांगता झाली.













या कार्यक्रमाचे , प्रास्ताविक , प्रमुख वक्ते यांचा परिचय व ओघवते सुत्रसंचलन डॉ. पल्लवी भावसार यांनी केले , तर शेवटी मराठी भाषा संवर्धन करण्याच्या या कार्यक्रमास डॉ. बळवंत मगदूम यांनी महाविद्यालयाच्या विनंतीला स्वीकारून “वाचन व आपण ”या व्याखानातून अनमोल मार्गदर्शन केल्याबद्दल या व्याख्यानाचे संयोजक सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ , मराठी विभाग आणि महाविद्यालया तर्फे आभार व्यक्त केले. पुढे कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दहिफळे आर.एन. , सूत्र संचलन साठी डॉ. पल्लवी भावसार आणि अभासी मध्यमा द्वारे उपस्थित असणारे नाशिक येथील एस.एम.आर.के. महाविद्यालयाचे डॉ. विवेक खरे , लोकसेवा महाविद्यालयाचे डॉ.गजानन जाधव , डॉ. संतोष देशमुख

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विधार्थी या सर्वाचे आभार व्यक्त केले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ”

**निमित्त**

# प्रश्नमंजुषा







दिनांक - २५/०१/२०२२ रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित , महिला कला महाविद्यालय , औरंगाबाद आमच्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने **“मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२** ”अनुषंगाने महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या साठी मराठी भाषेची उत्पती , प्राचीन , मध्ययुगीन , आधुनिक तसेच मराठी साहित्यातील विविध प्रवाह , साहित्य प्रकार याबाबत गुगल फोर्म च्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार , प्रसार वृद्धी साठी हा उपक्रम राबविण्यात आला . या प्रश्नमंजुषेचे संयोजन - सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ ( मराठी विभाग प्रमुख ) यांनी केले होते . अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ.दहिफळे आर. एन. हे होते . प्रश्नमंजुषेत अनेक विद्यार्थी सहभागी झाले. या उपक्रमात सहा. प्रा.गजानन फुलसावंगे , डॉ.साईनाथ बनसोडे , डॉ. घुनावत,डॉ.परमेश्वर काकडे, डॉ. वनिता साबळे , डॉ .पल्लवी भावसार., डॉ.

नरसिंग देशमुख , डॉ. अनिस मिर्झा बेग , सहा.प्रा.प्रकाश काळवणे व सर्वच शिक्षक शिक्षकेत्तर सहकारी याचे सहकार्य लाभले.


## “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ”

## निमित्त

### विशेष


# निमंत्रितांचे कवी संमेलन




प्रा.जितेंद्र शेजवळ is inviting you to a scheduled Zoom meeting.
**महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद**
मराठी विभाग
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा 2022
निमित्ताने आयोजित
**निमंत्रितांचे कवी संमेलन!**
Time: Jan 27, 2022 05:30 PM
Mumbai, Kolkata, New Delhi


Join Zoom Meeting
https://us05web.zoom.us/j/88227409475?pwd=WmtJaHZidVhlVm45bG9lT2wrNU5tdz09

Meeting ID: 882 2740 9475
Passcode: eN3LDG
आपले विनीत:
**प्रा.जितेंद्र शेजवळ**
मराठी विभाग प्रमुख
**डॉ.रामकिशन दहिफळे**
प्र.प्राचार्य
सर्वांनी **सायंकाळी ठीक 5.30 वाजता** जॉईन होऊन कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा!
5:31 PM




जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित , महिला कला महाविद्यालय , औरंगाबाद आणि " मुक्त-सृजन " साहित्य पत्रिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक -२७/०१/२०२२ रोजी ५. ३० वाजता झूम या आभासी माध्यमाद्वारे नामवंत कवींचे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने" **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२** " साजरा करत निमंत्रितांचेकवी संमेलन संपन्न झाले , प्रथम सर्व मान्यवर कवी / कवयत्री यांचे स्वागत व प्रास्ताविक डॉ.पल्लवी भावसार यांनी करून प्रत्येक कवी यांनी दोन दोन कविता सादर केल्या.

सुरवात कवी डॉ.विठ्ठल जायभाये यांनी , सध्याच्या परिस्थितीचे विवेचन करून आजचे वास्तव मांडणारी कविता. "काळा तुझ्या तडाख्याने काळ ही आवक झाला "तर अल्ला गेला , या कवितेत अल्लाह आणि ईश्वर एकत्र नांदत आहे. सामाजिक सद्भावना पेरणारी कविता सर्वांची दाद घेऊन गेली .









कवी डॉ. गोविंद काळे                    कवी रमजान मुल्ला

यानंतर आपल्या वेगळ्या शैली साठी प्रसिद्ध असणारे कवी रमजान मुल्ला यांनी त्यांच्या शालू  आणि अतिशय गाजलेली मुलगी नावाची रचना सादर करून सर्वांना वेगळ्या भावविश्वात नेले या कवितेला सर्वांनीच दाद दिली. या सर्व सामसूम काळात सर्वत्र शांतता पसरलेली असली तरी कवी जागा आहे आपल्या या जागृत तेचे प्रतिबिब त्यांच्या कव्यतुन व्यक्त करत कवी साकालीन काळाचा भाष्यकार कसा असतो हे दर्शविले.



कवी डॉ. गोविंद काळे

कवी डॉ. गोविंद काळे यांनी खुमासदार शैलीत आपल्या रचना सादर करून संमेलनात रंगत आणली  मीठ साखर ही हृदयाला भिडणारी कविता सादर केली







कवयत्री प्रिया धारूरकर                    कवयत्री संगीता अरबुने

वसई हून या कार्यक्रमात सहभागी झालेल्या कवयत्री संगीता अरबुने यांनी -पुरुष कसे सहजपणे जगतात ,पुरुष कसे सहज राहतात , ही पुरुष नावाची रचना सादर केली या काळातही मराठी कवितेचे असे कार्यक्रम केले जातात या साठी त्यांनी संयोजक , महाविद्यालय आणि प्राचार्य यांचे कौतुक करत “स्वप्न  ”नावाची अतिशय सुंदर रचनेचसादरीकरण केले.

रंगतदार होत असलेल्या या काव्यप्रवासात कवयत्री प्रिया धारूरकर यांनी त्यांच्या रचना सादर केल्या यात देहकृष्णा आणि तृष्णा या रचना सादर केल्यात. या सर्व काव्य प्रवासात तल्लीन असताना महाविद्यालयाची विद्यार्थिनी उमा घोंटे हिने सुद्धा सर्व मान्यवरांच्या परवानगीने स्व:ताची एक काव्य रचना सादर केली . तिला सर्वांनी पाठबळ दिल.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यांयालयाचे प्र. प्रचार्य डॉ. दहिफळे रामकिशन यांनी नंतर सर्व निमंत्रितांचे , कवी आणि कवयत्री यांचे जोरदार स्वागत करत ऋण व्यक्त केले , कवितेतील भाव , संवेदना , व त्या द्वारे होणारी मराठी भाषा , साहित्य व संस्कृतीच्या उन्नतीत असणार काव्याच स्थान किती मोलाचे , असून ते तो मौल्यवान खजाना या आभासी माध्यमातून सर्व मान्यवरांनी या कवी संमेलनातून आपल्याल्या दिला त्या बद्दल आनंद व्यक्त केला .

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुंदर , भुरळपाडणार सूत्र संचलन डॉ.पल्लवी भावसार यांनी केले.

शेवटी कार्यक्रमाचे संयोजक - सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ , मराठी विभाग प्रमुख, यांनी निमंत्रित कवी यांनी महाविद्यालयाच्या विनंतीला स्विकारुन सर्व उपस्थित राहिलात व सर्वांनी सादर केलेल्या विविध कविता , तसेच मार्गदर्शन व आपण दर्शविलेल्या स्नेहा बद्दल डॉ.गोविंद काळे , डॉ. विठ्ठल जायभाये , कवी रमजान मुल्ला , कवयत्री संगीता अरबुने आणि कवयत्री प्रिया धारूरकर यांचे आभार व्यक्त केले. अध्यक्ष स्थानी असलेले महाविद्यांयालयाचे प्र. प्रचार्य डॉ. दहिफळे रामकिशन यांनीही अध्यक्ष पदी राहून वेळोवेळी मार्गदर्शन केल्या मुळे हा सुंदर काव्य सहवास आपणा सर्वाना लाभला त्या बद्दल मराठी विभाग व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले.

सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे ही विभागा तर्फे आभार व्यक्त केले .सर्व विद्यार्थिनी व आभसी माध्यमातून हजर असणा-या सर्वांचे आभार व्यक्त करून या संमेलनाची सांगता झाली.



# “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ ” निमित्त

## विशेष व्याख्यान

### विषय - मराठी  विषयातील व्यवसाच्या संधी

### व्याख्याते - डॉ . संगीता घुगे




जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ,
महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद
*मराठी भाषा संवर्धन पंधरवडा  निमित्त व्याख्यान"
विषय : मराठी विषयातील व्यवसायाच्या संधी
वक्ते : प्रो .डॉ. संगीता गणपतराव घुगे ,
मराठी विभाग प्रमुख,
यशवंत महाविद्यालय , नांदेड
Time: Jan 28, 2022 04:00 PM


Topic: मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त व्याख्यान
मराठी विषयातील व्यवसायाच्या  संधी
Time: Jan 28, 2022 04:00 PM
Join Zoom Meeting
https://us05web.zoom.us/j/87957817659?pwd=TG04aVFxRzZXZnZUazhJbmxkWINRQT09

Meeting ID: 879 5781 7659
Passcode: Vg7928
10:13 AM

जनता जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त "समारोप प्रसंगी प्रो .डॉ. संगीता गणपतराव घुगे,मराठी विभागप्रमुख, यशवंत महाविद्यालय ,यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन दिनांक - २८/०१/२०२२ रोजी ४.०० झूम या आभासी मध्यमाद्वारे केले होते

विषय : मराठी विषयातील व्यवसायाच्या संधी

वक्ते : प्रो .डॉ. संगीता गणपतराव






## प्रो. डॉ. संगीता घुगे मार्गदर्शन करतांना

प्रसंगी प्रो.डॉ. संगीता घुगे यांनी मराठी भाषेची उत्पत्ती , प्राचीन , मध्ययुगीन, आधुनिक साहित्याचा आढवा घेत संत साहित्य, स्त्रियाचे लिखाण , ग्रामीण , आदिवासी लेखना पासून मराठी ची जगाने दखल घेतली त्या दलित साहित्याची पार्श्वभूमी व या सर्व साहित्यातील प्रकारामध्ये तांत्रिक , वाड.मयीन बदल , वेगवेगळ्या साहित्य प्रवाह आणि प्रकारातील भेद व बदलणा-या साहित्य प्रवासाचा अत्यंत नेमक्या शब्दात परिचय करून देऊन **मराठी विषयातील व्यवसायाच्या संधी** या विषया साठी उपरोक्त सर्व साहित्याचे वाचन , आकलन , लेखन , संवाद , वकृत्व ही सर्व कौशल्य आत्मसाद करणे

गरजेचे असून यातून विद्यार्थी आत्मविश्वासाने मराठीविषयातीलव्यवसायाच्यासंधीप्राप्त करु शकतो याची ग्वाही आपल्या विवेचनातून व्यक्त केली . मार्गदर्शन करताना मराठी लेखन ,कथा-कथन , विविध प्रसारमाध्यमातून मिळणा-या संधी बद्दल उदाहरणासह माहिती दिली. मुलाखत तंत्र त्यातून मिळणारा रोजगार , विविध वृत्तवाहिन्या आणि तेथे असणारी संधी , तुमच्यात असणारी कौशल्य अधिक चांगल्या पद्धतीने विकसित केल्यास पटकथा, कथा, कविता , या माध्यमातून ही आपण व्यवसायाच्या संधी शोधू शकतो . विविध परीक्षा चा अभ्यास मराठी तून करु शकता .एव्हढेच नाही तर मराठी साहित्य हा विषय घेऊन आपण राज्यसेवा लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देवून प्रशासकीय सेवत सुद्धा संधीचे सोने करु शकता. हे आत्मसाद करण्यासाठी मेहनत मराठी जे अद्ययावत ज्ञान , प्रचंड वाचन , कौशल्य आत्मसाद करून आत्मविश्वासाने या सर्वांचे सादरीकरण गरजेचे आहे.

शेवटी महाविद्यालयाने आपल्याला येथे ही संधी दिली त्या बद्दल आभार , व्यक्त करत त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला.






मनोगत व्यक्त करताना या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यांयालयाचे प्र. प्रचार्य डॉ. दहिफळे रामकिशन यांनी मराठी विषयातील व्यवसायाच्या संधी या व्याख्यानाने विद्यार्थी आणि सहकारी यांना निश्चित लाभ होईल , अशा मार्गदर्शना मुळे रोजगार संधी आणि भाषा संवर्धनासाठी चालना मिळेल अशी आशा व्यक्त केला. व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ चा समारोप अतिशय योग्य व्याख्यानाने होत असल्याने आनंद व्यक्त केला.

या सुंदर अशा व्याख्यान प्रसंगी सहा.प्रा. डॉ. पल्लवी भावसार यांनी पाहुण्यांचा परिचय आणि सुंदर प्रभावी असे सूत्र संचलन केले.

शेवटी कार्यक्रमाचे संयोजक - सहा. प्रा. जितेंद्र शेजवळ , मराठी विभाग प्रमुख, यांनी याप्रसंगी महत्वपूर्ण , रोजगाराच्या संधी आणि त्या साठी डॉ .संगीता घुगे यांच्या अभ्यासपूर्ण विवेचनासाठी आभार व्यक्त केले. व्याख्यान प्रसंगी अध्यक्ष असलेले महाविद्यांयालयाचे प्र. प्रचार्य डॉ. दहिफळे आर.एन. यांचे ही आभार व्यक्त केले
पंधरवडा सूत्रसंचलन करणा-या डॉ. पल्लवी भावसार याचे आभार व्यक्त केले , सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे ही विभागा तर्फे आभार व्यक्त केले .सर्व विद्यार्थिनी व आभसी माध्यमातून हजर असणा-या सर्वांचे आभार व्यक्त करताना सर्वांच्या सहकार्या शिवाय हे शक्य नव्हते म्हणून सर्व महाविद्यालयाचे आभार व्यक्त करत या व्याख्यानाची सांगता झाली.